# निवेदन

पुणे विभागाच्या कृषि सेवक पदाच्या भरतीचा जाहिरात क्रमांक जाक्र/आस्था/अ-१०/कृषि सेवक/जाहिरात/सन २०१८-१९/६० दिनांक ०३/०१/२०१९ रोजीच्या जाहीरातीनुसार दिनांक २२,२३ फेब्रुवारी २०१९ रोजी महापरिक्षा कक्ष, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) मंत्रालय, मुंबई ३२ यांच्या मार्फत विविध केंद्रावर परिक्षा घेण्यात आली होती. परंतु सदर परिक्षेच्या निकाला संदर्भात मा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद येथे मुळ अर्ज क्र ७२५/२०१९ व यामध्ये संकीर्ण अर्ज ३७७/२०१९ दाखल झाला त्यानुसार मा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद यांनी पुणे विभागाचा निकाल राखुन ठेवला होता. त्यानुसार कृषि आयुक्तालयाचे पत्र क्रमांक जाक्रकृआ/बीवायझेड २०१८/कृसे/१३१८/सरळसेवाभरती/आस्था-४/१०२०/२०१९ दिनांक ०३/०९/२०१९ नुसार सुधारित निकाल प्राप्त झालेला आहे. सुधारीत निकालानुसार या कार्यालयाचे पत्र क्रमांक आस्था/अ-१०/कृसे/२०१९/परिक्षा/६८२/२०१९ दिनांक १६/०९/२०१९ नुसार कृषि आयुक्तालयास कळविण्यात आले आहे. मा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक १८ डिसेंबर २०१९ रोजीच्या सुनावणी प्रसंगी अर्जदार व अर्जदाराच्या वकीलांनी मा न्यायासनास पुढील कालावधीमध्ये सदर मुळ अर्जावर कार्यवाही न करता मुळ अर्ज काढुन घेण्यास मान्यता दयावी अशी विनंती केली असता दोन्ही बाजु विचारात घेवून मा. न्यायासनानी मुळ अर्ज क्र ७२५/२०१९ खारीज केला व देण्यात आलेली अंतरीम स्थगिती उठविण्यात आली आहे. सदरचा न्यायनिर्णय विचारात घेता कृषि आयुक्तालयाचे दिनांक ०३/०९/२०१९ रोजीचा सुधारीत निकाल आधारभूत धरुन अनुसुचित क्षेत्राबाहेरील व अनुसुचित क्षेत्रातील सर्वसाधारण गुणांकन यादी www.krishi.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर वर दिनांक २१ डिसेंबर २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

सर्वसाधारण गुणांकन यादीमध्ये उमेदवारांच्या काही आक्षेप / हरकती असल्यास निकाल प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन शासकीय सुटट्या वगळुन ८ दिवसांच्या आत लेखी व आधारभुत कागदपत्रासह **विभागीय कृषि सहसंचालक पुणे विभाग, पुणे. कृषि भवन, शिवाजीनगर, नरवीर तानाजी वाडी पुणे- ४११००५** या कार्यालयात **सकाळी १०.३० ते ५.३०** या वेळेत प्रत्यक्ष सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार प्राप्त आक्षेपांचा/हरकतींचा विचार करुन सुधारित सर्वसाधारण गुणांकन यादी www.krishi.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर वर दिनांक३०जानेवारी २०२० रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ — पुणे
दिनांक-३० /०१/२०२०

**( रफिक नाईकवाडी )**
विभागीय कृषि सहसंचालक
पुणे विभाग पुणे.